


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २१३ वा गुरूवार दि १६ ऑक्टोबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आम्ही भाजपलाही पत्र दिलं; निवडणूक आयोगाच्या बैठकीनंतर उद्धव ठाकरेंचा मोठा खुलासा....

वृत्तसंस्था/मुंबई

मतदारयाद्यांमधील घोळाच्या मुद्यावर महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्ष एकत्र आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेण्याआधी आम्ही भाजपलाही पत्र दिलं होतं. पण भाजपकडून कोणीही या बैठकीसाठी आलेलं नाही. हा विषय विधानसभा निवडणुकीपासून सगळ्यांसमोर आला आहे. मतदारयादीत एका-एका व्यक्तीचं नाव चार ठिकाणी नोंदवलं गेलंय, हा सगळा खेळखंडोबा सुरू आहे. निवडणूक घ्यायची असेल तर ती नि:पक्षपातीपणानं झाली पाहिजे, नाहीतर निवडणूक घेण्यापेक्षा सिलेक्शन करून सरकार बनवून टाका, असं आम्ही दोन्ही निवडणूक आयुक्तांना सांगितलं आहे. आता तेवढंच बाकी आहे,ङ्ख असा हल्लाबोल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. राज्य निवडणूक आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीनंतर झालेल्या विरोधी पक्षांच्या पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरेंनी ही टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांनी या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांवर खोचक शब्दांत टीका केली आहे. ङ्खमला निवडणूक आयोगाचा अपमान करायचा नाही, पण या दोघांकडे निवडणूक आयुक्त म्हणून अधिकार आहेत की आम्ही कठपुतळ्या बाहुल्यांशी बोलतोय, असं बैठकीत आम्हाला वाटत होतं,ङ्ख असं ते म्हणाले. तसंच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ जुलैची मतदारयादी ग्राह्य धरली जाणार आहे. म्हणजे १ जुलैनंतर ज्यांना १८ वर्ष पूर्ण झाली असतील त्यांना या निवडणुकीत मतदानाचा अधिकारच मिळणार नाही,



असा आक्षेपही यावेळी उद्धव ठाकरे यांनी नोंदवला आहे. सुप्रीम कोर्टाने जशा पक्षी-प्राण्यांच्या केस सुमोटो म्हणून घेतल्या तशा निवडणूक प्रक्रियेबाबत सुमोटो केस घ्यावी. लोकशाही टिकवण्यासाठी हे गरजेचं आहे. आम्ही राजकीय पक्ष म्हणून आमचं कर्तव्य पार पाडतोय, निवडणूक आयोगाचं दार ठोठावतोय. पण समोरून काही दाद मिळत नाही. लोकशाहीच्या नावाने हुकूशाही लादणार असतील तर आम्ही ते होऊ देणार नाही. जोपर्यंत निवडणूक मतदार यादीतील घोळ सुधारला जात नाही, तोपर्यंत निवडणुका घेता कामा नये. विधानसभा निवडणुकीत जे झालं त्याने सगळ्यांनाच धक्का बसला. त्यामुळे आम्ही सत्ताधाऱ्यांच्या चोरवाटा आता अडवल्या आहेत. मतचोरी आणि पक्षचोरी या सत्ताधाऱ्यांच्या चोरवाटा आहेत आणि या वाटा आम्ही आता अडवल्या आहेत.

# मग तुमचं काम काय? निवडणुकाच रद्द करा, यादीत घोळ असेल तर... राज-उद्धव बैठकीतच बरसले...

वृत्तसंस्था/मुंबई

राज्य निवडणूक आयोगासोबत आज दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांची बैठक झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारयाद्यांबाबत असलेल्या तक्रारींवरून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह इतर नेत्यांनी राज्य निवडणूक आयुक्तांसोबत काल बैठक घेत आपले मुद्दे मांडले. त्यानंतर आज शरद पवार वगळता बाकीच्या नेत्यांनी पुन्हा एकदा निवडणूक आयुक्तांकडे जात आपल्या तक्रारी नोंदवल्या. या बैठकीत ठाकरे बंधूंनी आक्रमकपणे आपले मुद्दे मांडल्याची माहिती समोर आली आहे. मतदारयाद्यांबाबत तक्रारी असल्याने लगेच निवडणुका घेऊ नका, अशी मागणी राज ठाकरेंनी या बैठकीत केली आहे. तर घेत नाही, म्हणजे सर्व पुरावे तुम्ही नष्ट कराल, असा हल्लाबोल उद्धव ठाकरेंनी केल्याचे समजते. बैठकीत आपले मुद्दे मांडताना राज ठाकरे म्हणाले की, ङ्खनिवडणुका राजकीय पक्ष लढवतात. मग राजकीय पक्षांना शेवटची मतदार यादी दाखवत का नाही? मतदार नोंदणी बंद करून लपवाछपवी कशासाठी? सर्व राजकीय पक्षांचं एकमत होत नाही तोपर्यंत निवडणूक घेऊ नका. सत्तेतील तीन पक्षांसाठी तुम्ही काम करत नाही,ङ्ख अशा शब्दांत राज ठाकरेंनी आयोगाच्या अधिकाऱ्यांना सुनावलं. तसंच आमचं तुमचं करू नका, आमच्यासाठी निवडणूक आयोग एकच, असंही राज ठाकरे यावेळी म्हणाल्याची माहिती आहे. दरम्यान, ङ्ख बाळासाहेब थोरात ८ टर्म ८०-९० हजार मतांच्या फरकाने निवडणूक जिंकतात आणि यंदा लाखाने पडले, हे कसं शक्य आहे?ङ्ख असा सवाल या बैठकीत राज ठाकरेंनी उपस्थित केला. त्यावर निवडणूक आयोगाचे दोन्ही अधिकार निरुत्तर झाल्याचे पाहायला मिळाले. ङ्खमतदार याद्या आम्हाला द्या, आम्हीही शहानिशा करू. मतदार यादीत घोळ असेल तर तुम्ही सुप्रीम कोर्टाला सांगा, आम्ही तयार नाही ते आणि निवडणूक पुढे ढकला,असंही राज ठाकरे यांनी यावेळी म्हटलं. मतदारयाद्यांविषयीच्या संभ्रमावर बोलताना राज्य निवडणूक आयोगासोबतच्या बैठकीत उद्धव ठाकरेही




आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. चोक्कलिंगम म्हणतात काही जबाबदारी आमच्याकडे नाही, राज्य निवडणूक आयोग म्हणतं आमच्याकडे नाही, मग आम्ही कुणाशी बोलू? त्रुटीसह जर निवडणुका घ्यायच्या असेल तर निवडणुका कशाला घेता? डायरेक्ट करून टाका,ङ्ख अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी आपला संताप व्यक्त केला.

# कायद्याच्या हातांपलीकडचे!

## संपादकीय लेख

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे. ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. ङ्गहे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाहीफ असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात. आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ङ्ग अदखलपात्र गुन्हा म अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके. मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे. सत्तेत असलेला पक्ष बदलत जाईल. मात्र, शासकीय अधिकारी, विभागप्रमुख हे कायमस्वरूपी पद असते. सरकार म्हणजे कार्यपालिका, आणि तिची बांधिलकी फक्त कायदा आणि राज्य घटनेशी असते. सत्तेत असलेला पक्ष व त्या सत्ताधारी पक्षाचे मंत्री हे अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करतात आणि अधिकारी देखील ते खपवून घेतात. कायद्याच्या कक्षेत येणारी कारवाईही गृह विभाग करत नाही किंवा त्याचा कारभार सांभाळणारा मंत्री अधिकाऱ्यांना कह्यात ठेवतो. आमदाराच्या प्रकरणात गृह खात्याने काय कुठली चौकशी केली, त्याचा अहवाल तयार केला का व तो कधी व कोणाला सादर केला याचा तपशील लोकांसमोर नाही. भारतीय न्याय संहितेतील अदखलपात्र गुन्हेच संबंधित आमदाराच्या हातून घडले, हा निष्कर्ष कशावर आधारित आहे हे कळेल का? लोकप्रतिनिधी आमदार निवासातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना नुसता दटावत नव्हता, तर सर्वदेखत शिवीगाळ, मारहाण इत्यादी करत होता. इतके सारे असूनही दखलपात्र गुन्हा घडत नाही, हे पटत नाही. लोकप्रतिनिधींना विशेष स्थान व संरक्षण नवीन संहितेत देण्यात आले आहे का, आणि तरतुदींचा असा अन्वयार्थ सत्ताधारी व विरोधी असा फरक करू देणार नाही. मग जागेचा, ठिकाणाचाही प्रश्न नाही; कारण असे वर्तन उद्या मंत्रालयातील, विधिमंडळातील व विश्रामगृहातील वा खासगी उपाहारगृहात केले तरी कुठलीच कारवाई करता येणार नाही वा होणार नाही. जे आमदार निवासाच्या आवारात चालते तेच शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापनांत चालवावे लागेल. मनाजोगे उत्तर किंवा अपेक्षित खुलासा मिळत नसतो तेव्हा शाई फ ेकणे, लाथा मारणे, तोंडाला काळे फासणे इत्यादी महाराष्ट्राला नवे नाही. नेते, कार्यकर्ते कोणाची भीती न बाळगता असे करीत असतात.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कीबोर्ड दुरुस्त करण्याच्या बहाण्याने विद्यार्थिनीच्या डेस्ककडे जाऊन चुकीचा स्पर्श

**पुणे :** पुणे शिक्षणाचं माहेर घर मानलं जातं. पण याच शिक्षणाच्या माहेरघरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनी खरंच सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. त्यामागे कारणही तसंच आहे. पुण्यात गुन्हेगारीच्या घटना एकीकडे प्रचंड वाढलेल्या आहेत. काही दिवसांपूर्वी सणासुदीच्या काळात टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळाला होता. त्यानंतर गुंड निलेश घायवळच्या टोळीतील आरोपींनी दोन सर्वसामान्य नागरिकांवर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार समोर आला होता. हेही असे की थोडे आता एका महाविद्यालयात टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पुण्यात अराजकतेचं कृत्य करणाऱ्यांना कोणतही भय राहिलेलं नाही का? असा प्रश्न उपस्थित होतोय.





विशेष म्हणजे शिक्षणाच्या महेरघरात विद्यार्थिनी कॉलेज प्रशासनाकडून सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आहे. एकीकडे वाढती प्रेमी युगलांची संख्या पाहता विविध प्रकार घडतानाच्या घटना समोर येत असतातच. मात्र या शिक्षणाच्या म हेरघरात विद्यार्थ्यांना सुरक्षा देण्याचं काम हे त्या प्रशासनाचा असतो. पण असं असलं तरी कुंपनच शेत खात असल्याचा प्रकार समोर आला आहे. कॉलेजच्या प्रशासनात असलेल्या एका इसमाकडूनच विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. पुण्यात एका नामांकित महाविद्यालयात प्रॅक्टिकल दरम्यान कॉलेजच्या टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात अंबादास वैद्य असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर भा.दं.सं. ३१७/२०२५ बीएनएस अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा पर्वती पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी वैद्य हा कॉलेजम ध्ये टेक्निशियन म्हणून कार्यरत होता. घटनेच्या वेळी कॉम्प्युटर लॅबमध्ये दोन विद्यार्थिनी प्रॅक्टिकल देत होत्या. त्यावेळी आरोपीने कीबोर्ड दुरुस्त करण्याच्या बहाण्याने पीडित विद्यार्थिनीच्या डेस्ककडे जाऊन तिच्या अंगाला अनुचित स्पर्श केला. हा प्रकार पाहून तिची सोबत असलेली मैत्रीण घाबरून क्लासरूम च्या बाहेर धावली आणि मदतीसाठी आरडाओरडा केला.

घटनेनंतर पीडित विद्यार्थिनीने हा प्रकार कॉलेज प्रशासनाला तसेच आपल्या पालकांनाही सांगितला. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपीवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतरही कॉलेज प्रशासनाने आरोपीविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. अंबादास वैद्य हा अद्याप कॉलेजमध्ये संगणक विभागात काम पाहत असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाची भूमिका आणि जबाबदारीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## पळून लग्न केलं, दीड वर्षातच प्रेमाचा भयंकर शेवट

**झाशी :** एका प्रेमविवाहाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दीड वर्षांपूर्वी प्रेमाचे वचन घेतलेल्या नात्याचा कधी असा अंत होईल असा कोणी विचारही केला नसेल. उत्तर प्रदेशातील झाशी येथील अलिगोल खिडकी परिसरात राहणाऱ्या २१ वर्षीय मेहक तिच्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. म हकने सुमारे दीड वर्षांपूर्वी पळून जाऊन विवेक अहिरवार याच्याशी लग्न केलं होतं. मेहकच्या पालकांनी सासरच्यांवर हत्येचा आरोप केला आहे



मृत मेहकती आई गुडियाने आरोप आहे की तिचा जावई विवेक आणि त्याचे कुटुंब सतत तिचा छळ करत होते. अखेर तिला मारून टाकलं. झाशी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवलं.मेहकची आई गुडियाने सांगितलं की, तिची मुलगी लहानपणापासूनच आनंदी आणि मिलनसार होती. विवेक अहिरवार हा त्यांच्या शेजाऱ्याच्या घरी वारंवार येत असे. तिथे त्यांची भेट झाली आणि हळूहळू त्यांची मैत्री प्रेमात बदलली. ७ मार्च २०२४ मध्ये विवेक माझ्या मुलीसोबत पळून गेला. आम्ही पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली, पण कोणतीही कारवाई झाली नाही. सुमारे दोन महिन्यांनंतर आम्हाला कळले की त्यांचे लग्न झाले आहे आणि ते इम्लीपुरा परिसरात भाड्याच्या घरात राहत आहेतलग्नानंतर काही महिने सर्व काही सुरळीत सुरु होते, परंतु नंतर विवेक आणि त्याच्या कुटुंबाने मेहककडे पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली असा आरोप आहे. जेव्हा त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तेव्हा मेहकला मारहाण आणि मानसिक छळ करण्यात आला.


## दारुच्या नशेत तर्राट, लागोपाठ ६ वाहनांना धडक

**पुणे :** दारूच्या नशेत गाडी चालवणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबलने सहा वाहनांना धडक देत अनेकांना गंभीर जखमी केलं आहे. ही धक्कादायक घटना पुणे-नगर महामार्गावर रविवारी रात्री घडली. रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला कॉन्स्टेबल हेमंत इनामे रविवारी रात्री एका पार्टीमध्ये भरपूर दारू प्यायल्यानंतर आपल्या कारने पुणे-नगर रस्त्यावर वेगाने वाहन चालवत होता. या दरम्यान त्याने नियंत्रण गमावून एकूण सहा वाहनांना धडक दिली, ज्यात अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. मात्र, रांजणगाव पोलिसांनी केवळ गुन्हा दाखल करून इनामेला अटक केली नाही. तसेच त्याची वैद्यकीय तपासणीही करण्यात आलेली नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पोलीस दलावर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं असून, निष्पक्ष तपासाची मागणी होत आहे.

## हमासने ओलीस ठेवलेल्या बिपिन जोशीची हत्या, बॉडी पाठवली

**नवी दिल्ली :** हमासने ओलीस ठेवलेला नेपाळचा हिंदू तरुण बिपिन जोशी याला इस्रायली अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले आहे. हमासने ओलीस धरलेल्या चार जणांचे मृतदेह पाठवल्यानंतर ही घोषणा करण्यात आली. बिपिन जोशी याचे पार्थिव तेल अवीव येथे आणले जात असून डीएनए चाचणीनंतरच त्याची ओळख पटवली जाईल. त्यानंतर ते नेपाळला पाठवले जाईल. बिपिन जोशी हे हमासने ओलीस ठेवलेले एकमेव- बिग इस्रायली जिवंत व्यक्तींपैकी एक होते.इस्रायलमधील नेपाळचे राजदूत धन प्रसाद पंडित यांनी नेपाळी माध्यमांना सांगितले की, बिपिन जोशी यांचे पार्थिव तेल अवीव येथे आणले जात आहे. बिपिनच्या पार्थिवाबाबत आम्हाला हमासकडून माहिती मिळाल्याचे पंडित म्हणाले.इस्रायली अधिकारी डीएनए चाचणी करून बिपीन जोशी याची ओळख पटवतील. ओळख पटल्यानंतरच त्याचे पार्थिव नेपाळला पाठवले जाईल. नेपाळला पाठवण्यापूर्वी इस्रायली सरकारकडून अंतिम संस्कार केले जातील. नेपाळी दूतावासाच्या म दतीने पार्थिव मायदेशी पाठवले जाईल. बिपिन जोशी हा हल्ल्याच्या एक महिना आधी नेपाळहून इस्रायलला आला होता. तो गाझा सीमेवरील किबुत्झ अलुमिम येथे शेतीचे शिक्षण घेण्यासाठी आणि काम करण्यासाठी आला होता. या उपक्रमातील १७ नेपाळी विद्यार्थ्यांपैकी १० जणांचा हल्ल्यात मृत्यू झाला. बिपिन जोशी बॉम्ब शेल्टरमध्ये असताना काही ग्रेनेड बाहेर फ ेकण्यात यशस्वी झाला होता. यात तो जखमी झाला आणि त्याला ओलीस ठेवण्यात आले. बिपीन जोशीची १७ वर्षीय बहीण पुष्पा जोशी आपल्या भावाला सोडवण्यासाठी पश्चिम नेपाळहून काठमांडूला आठ तास बस प्रवास करुन अधिकाऱ्यांना विनवणी करण्यासाठी गेली होती.ऑगस्टमध्ये बिपिन जोशीचे कुटुंब इस्रायलला गेले होते.



## कुटुंबीय पोहोचण्यापूर्वीच प्रेमीयुगुल कारमध्ये मृत

**लखनऊ :** एका प्रेमीयुगुलाने विष प्राशन करुन आपल्या आयुष्याची अखेर केली. या घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी त्यांना रुग्णालयात नेले, जिथे उपचारादरम्यान त्या दोघांचाही मृत्यू झाला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले आणि पोस्टमॉर्टमसाठी पाठवले आहेत. ही घटना रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गोसाईगंज पोलीस स्टेशन परिसरातील आउटर रिंग रोडवर घडल्याची माहिती आहे.लखनऊ येथील या जोडप्याने रस्त्याच्या कडेला त्यांची कार पार्क केली आणि त्याच गाडीत विष प्राशन केले. त्यांची प्रकृती बिघडल्यानंतर त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांना याची माहिती दिली आणि लोकेशन पाठवलं. माहिती मिळताच कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले आणि दोघांनाही रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्यांना वाचवता आलं नाही. मृत प्रियकराची ओळख २१ वर्षीय सुभाष रावत अशी झाली आहे. तर, त्यांची प्रेयसी १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी होती जी सध्या दहाव्या वर्गात शिकत होती. दोघांमध्ये दीर्घकाळापासून प्रेमसंबंध होते असे वृत्त आहे.

## पत्नीला संपवलं, नंतर चाकूसह पोलीस ठाण्यात पोहोचला पती

**सोलापूर :** शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना घडली आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला चाकूने भोसकून ठार केलं आहे. सुहास तुकाराम सिद्धगणेश (रा. तळेहिप्परगा सोलापूर) असं संशयित आरोपीचं नाव असून यशोदा सुहास सिद्धगणेश असं मृत महिलेचं नाव आहे. ही घटना सोलापूर शहरातील न्यू बुधवार पेठ मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली आहे.अन्नपूर्णा बाळशंकर(वय ५० वर्ष) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुहास सिद्धगणेश हा अनेक महिन्यांपासून पत्नी यशोदा याच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यामुळे दोघा पती-पत्नीत तक्रार होत होती. मंगळवारी सकाळी या तक्रारीचे भांडणात रूपांतर झाले आणि दोघांच्या संसाराचा भयंकर शेवट झाला. सुहासने पत्नीला ठार करून थेट पोलीस स्टेशन गाठले आणि पोलिसांना हकीकत सांगितली. रक्ताने माखलेले कपडे आणि हातात चाकू पाहून पोलिसांना धक्काच बसला. यशोदाच्या आईने





आणि बहिणीने तिला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत यशोदा यांची बहीण अन्नपूर्णा बाळशंकर यांनी सोलापुरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यशोदा सिद्धगणेश ही अनेक दिवसांपासून एका मुलीला सोबत घेऊन सोलापूर शहरात पतीपासून विभक्त राहत होती. मंगळवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास यशोदा सिद्धगणेश हिच्या घरातून जोरात ओरडण्याचा आवाज येत होता. त्यावेळी अन्नपूर्णा बाळशंकर यांनी यशोदाच्या घरात आत डोकावून पाहिलं असता यशोदा लोखंडी बेडजवळ जमिनीवर खाली पडलेली होती व सुहास सिद्धगणेश हा त्याच्या हातातील चाकूने यशोदा हिच्या पोटात व गळ्यावर वार करुन चाकू खुपसत होता. अन्नपूर्णा बाळशंकर यांनी आरडाओरडा करुन यशोदा हिच्या जवळ जात जाण्याचा प्रयत्न केला. सुहास याने हातात चाकू घेऊन म्हणाला की, 'आमच्या मध्ये कोणी आला तर, मी सर्वांना खल्लास करुन टाकीन' अशी धमकी देत यशोदाला खुपसतच राहिला. काही वेळाने हातामध्ये चाकू घेऊन सुहास सिद्धगणेश हा घरातून निघून गेला. हातामध्ये असलेला चाकू रक्ताने माखलेला होता. अन्नपूर्णा यांनी आरडाओरडा करुन आजूबाजूच्या लोकांना गोळा केले. यशोदा ही रक्ताचे थोरोळ्यात निपचित पडली होती.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निवडणुकांमध्ये ईव्हीएममुळे मोठी अडचण?

## मध्यप्रदेशची मदत घ्यावी लागणार, नेमकं काय घडलं?

**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने एकीकडे निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही पूर्ण केली असली, तरी त्याच वेळी प्रत्यक्ष मतदान घेण्यासाठी लागणाऱ्या 'ईव्हीएम'चा तुटवडा हा कळीचा मुद्दा ठरला आहे. राज्य निवडणूक आयोगाने परराज्यातून 'ईव्हीएम' आणले तरच महानगरपालिकेच्या निवडणुका लवकर घेता येणार आहेत. मध्य प्रदेशातून 'ईव्हीएम' आणण्याबाबत चर्चा केली जात असल्याचे समजते. दुसऱ्या राज्यातून 'ईव्हीएम' न आल्यास महापालिकांच्या निवडणुका या १० वी- १२वीच्या परीक्षांनंतर घेतल्या जातील, अशी शक्यता आहे.राज्यातील महानगरपालिका निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली असली, तरी आरक्षणाच्या सोडतीला मुहूर्त सापडत नसल्याचं चित्र सध्या दिसत आहे. त्याचवेळी दहावी व बारावीच्या परीक्षांच्या तारखा या नेहमीच्या तुलनेत १० ते १५ दिवस लवकर घेण्यात येत असल्याने महापालिकांच्या निवडणुका लांबणार की काय, अशी शंका राजकीय वर्तुळात उमटली आहे.महानगरपालिकेची प्रभागरचना अंतिम करण्यात आली असून, त्यानुसार अध्यादेश प्रसिद्धी करण्यात आला. निवडणुकांसाठी आवश्यक असणारी मतदारयाद्या बूथनिहाय फोडण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. परंतु, त्याच वेळी आरक्षणांची सोडत काढण्यास अजूनही मुहूर्त लागलेला नाही. येत्या एक-दोन दिवसांत त्याचं वेळापत्रक जाहीर झालं नाही, तर आरक्षणाची सोडत निघण्याचा कार्यक्रम हा दिवाळीनंतरच घेतला जाईल की काय, अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे. महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी याबाबत नगर विकास व राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असला, तरी अजूनही ठोस माहिती हाती आलेली नाही.महापालिकांच्या निवडणुका महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडून जानेवारीच्या अखेरीपर्यंत घेण्याचा पुरेपूर प्रयत्न सुरू असला, तरी 'ईव्हीएम'च्या उपलब्धतेवरच हा मुहूर्त साधणे शक्य होणार आहे. महापालिकांसाठी वेळेत 'ईव्हीएम' उपलब्ध न झाल्यास महापालिका निवडणुका या दहावी-बारावीच्या परीक्षा झाल्यानंतर मार्च ते एप्रिल या कालावधीत होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'ने ही शंका यापूर्वीच उपस्थित केली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सोमवारी दहावी-बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या असून त्यात यापूर्वीच्या तारखांच्या तुलनेत लवकर परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्याचं चित्र दिसत आहे.राज्य निवडणूक आयोगाकडून



अजून आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला नाही. हा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष सोडत घेणे, त्यावर हरकती व सुनावणी घेऊन आरक्षणे निश्चित करण्यासाठी सात ते पंधरा दिवसांचा कालावधी लागणार आहे. महानगरपालिकांच्या निवडणुका सध्याच्या परिस्थितीत कितीही लवकर घेण्याचा निर्णय झाला, तरी प्रत्यक्षात मतदान होण्यासाठी जानेवारी महिना उजाडेल, अशी परिस्थिती दिसत आहे.

दरम्यान, सुप्रीम कोर्टाच्या सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ऑक्टोबर अखेरीपर्यंत घेणे आवश्यक होते. परंतु, प्रत्यक्ष निवडणुका घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी लक्षात घेत या निवडणुकांचा कालावधी वाढवून घेण्यात आला.

# गायिकेचा मतदारसंघ ठरला?



**पाटणा :** लोकप्रिय लोक गायिका मैथिली ठाकूर नं भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. मैथिली ठाकूर भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सातत्यानं सुरु होती. ही चर्चा खरी ठरली आहे.

मैथिली ठाकूरनं तिच्या वडिलांसह गेल्याच आठवड्यात भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची भेट घेतली होती. तेव्हाच त्यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा रंगली होती. भाजपमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मैथिली ठाकूरला दरभंगामधील अलीनगर मतदारसंघातून उमेदवारी दिली जाऊ शकते. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघातून विकासशील इन्सान पक्षाच्या तिकीटावर मिश्रीलाल यादव विजयी झाले होते. पण नंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मैथिली ठाकूरला उमेदवारी मिळणार असल्याचं लक्षात येताच मिश्रीलाल यादव यांनी भाजपचा राजीनामा दिला. गेल्याच आठवड्यात त्यांनी राजीनामा दिलेला आहे.अलीनगर मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासून भाजपला एकदाही येथून विजय मिळवता आलेला नाही. गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये केवळ एकदाच हा मतदारसंघ भाजपच्या वाट्याला गेला.

## मनसेच्या दीपोत्सवाचं उद्घाटन उद्धव ठाकरेंच्या हस्ते

**मुंबई :** ठाकरे बंधू यांच्या युतीची जोरदार चर्चा असताना उद्धव आणि राज यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. दोघांकडून युतीची घोषणा झालेली नसलेली तरी वाढत्या भेटीगाठी पाहता युती जवळपास निश्चित मानली जात आहे. मागील दोन्ही रविवारी ठाकरे बंधूंच्या भेटी झाल्या आहेत.

गेल्या ३ महिन्यांत ठाकरे बंधू सहावेळा एकमेकांना भेटलेले आहेत. त्यानंतर आता सातव्या भेटीचा मुहूर्तदेखील ठरला आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दरवर्षी शिवाजी पार्कात दीपोत्सवाचं आयोजन करण्यात येतं. यंदा दीपोत्सवाचं १३ वं वर्ष आहे. १७ ऑक्टोबरला संध्याकाळी साडे सहा वाजता उद्धव ठाकरे यांच्या दीपोत्सवाचं उद्घाटन होईल. या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका प्रसिद्ध झाली आहे. विशेष म्हणजे त्यात उद्धव ठाकरे यांचा खास उल्लेख करण्यात आला आहे. उद्धव ठाकरे यांच्या नावाखाली शिवसेना पक्षप्रमुख असा उल्लेख करण्यात आला आहे.

# पवार यांनी कान टोचल्यानंतर संग्राम जगताप यांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आज मुंबईच्या वरळी डोम येथे महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यभरातील पदाधिकारी, आमदार, खासदार, मंत्री उपस्थित होते. या बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगर शहरचे आमदार संग्राम जगताप हे देखील उपस्थित होते. संग्राम जगताप हे सातत्याने टोकाच्या वक्तव्यांमुळे चर्चेत येत आहे. नुकतंच त्यांनी एक वक्तव्य केलं होतं. दिवाळीची खरेदी ही केवळ हिंदूंकडून करावी, असं वक्तव्य त्यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावरुन नवा राजकीय वाद सुरु झाला होता. विरोधकांकडून त्यांच्यावर टीका केली जात होती. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील जातीय सलोखा बिघडणार नाही याची काळजी घेण्याचं आवाहन केलं होतं. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून संग्राम जगताप यांना नोटीस पाठवण्यात आली होती. यानंतर आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने संग्राम



जगताप आणि अजित पवार समोरासमोर आले.राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजच्या बैठकीत अजित पवार यांनी नाव न घेता संग्राम जगताप यांचे कान टोचले. या बैठकीनंतर संग्राम जगताप बाहेर आले. यावेळी त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. 'हा पक्षाचा मेळावा होता. या मेळाव्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आढावा बैठक होती. या बैठकीत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुढची दिशा काय असली पाहिजे यावर विचार करण्यासाठी बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं', अशी प्रतिक्रिया संग्राम जगताप यांनी दिली.यावेळी पत्रकारांनी संग्राम जगताप यांना त्यांना पाठवण्यात आलेल्या नोटीसबाबत प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी भूमिका मांडली.

# निवडणुकीसाठी ठाकरे बंधूही मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या भेटीला

**मुंबई :** निवडणूक आयोग मुंबई महापालिका निवडणुकीत 'व्हीव्हीपॅट'ची सुविधा असलेली मतदानयंत्रे (ईव्हीएम) उपलब्ध करून देऊ शकत नसेल तर येथील निवडणूक मतपत्रिकेवर घ्यावी' अशी मागणी महाविकास आघाडीने मंगळवारी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याकडे केली. शिवाय, अंतिम मतदारयादीत लाखो चुका असल्याने मतदारयाद्यांच्या दुरुस्त्यांशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणीही आघाडीने केली.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आयोगाने १ जुलै २०२५ची मतदारयादी अंतिम केल्याच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने चोक्कलिंगम यांची भेट घेऊन मतदारयादी आणि निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला. महापालिका निवडणुकांसाठी 'व्हीव्हीपॅट' न वापरण्याच्या निर्णयावर शिष्टमंडळाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'सन २०२२ मध्ये होणे अपेक्षित असलेल्या स्थानिक निवडणुका २०२६मध्ये होणार



आहेत. गेल्या चार वर्षांत निवडणूक आयोग कोणती तयारी करीत होता? हजारो कोटी रुपये खर्च करून मागवलेली 'व्हीव्हीपॅट' नक्की कुठे गेली? असे प्रश्न आघाडीच्या नेत्यांनी उपस्थित केले.आघाडीच्या शिष्टमंडळाने चोक्कलिंगम राज्य निवडणूक आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यासोबत विरोधकांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ईव्हीएमवरील जनतेचा विश्वास, व्हीव्हीपॅटचा वापर, प्रभाग पद्धती रद्द करण्याची मागणी, दुबार मतदार नोंदणी आणि सदोष मतदार याद्या यांसारख्या अनेक गंभीर मुद्द्यांवर चर्चा झाली. मात्र, या बैठकीत ठोस तोडगा न निघाल्याने सर्व मुद्द्यांवर एकत्रितपणे विचारविनिमय करण्यासाठी आज, बुधवारी पुन्हा एक संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. स्थानिक निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाकडे, तर मतदारयादीची जबाबदारी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे आहे.विरोधकांनी राज्य निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'सामान्य जनतेचा 'ईव्हीएम'वर विश्वास नाही. त्यामुळे मतदारांसाठी खातरजमा करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'व्हीव्हीपॅट' आहे. तोच मार्ग तुम्ही बंद करणार असाल तर निवडणूक आयोगाच्या कारभारावर लोकांनी विश्वास कसा ठेवायचा?' प्रभाग पद्धतीमुळे व्हीव्हीपॅट वापरता येत नसेल, तर ही प्रभाग पद्धतच रद्द करावी, अशी मागणीही विरोधकांनी केली. संपूर्ण भारतात महापालिका आणि नगरपालिकेतील प्रभाग निवडणूक पद्धत कुठेही अस्तित्वात नाही, याकडेही त्यांनी चोकलिंगम यांचे लक्ष वेधले.राज्यात मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये मोठ्या संख्येने परराज्यातून येणारे कामगार मतदार म्हणून नोंदणी करतात. यातील अनेक जण त्यांच्या मूळ राज्यातही मतदार असतात. त्यामुळे दुबार नोंदणी टाळण्यासाठी आयोग काय उपाययोजना करत आहे, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. बिहारमध्ये दुबार नावे काढण्यासाठी आयोगाने विशेष मोहीम राबवली, मग महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी असा प्रयत्न का दिसत नाही, अशी विचारणा त्यांनी केली. दुबार नोंदणी काढण्यासाठी 'डी-डुप्लिकेशन' पद्धतीचा वापर करण्याची मागणीही विरोधकांनी केली. विधानसभा निवडणुकीसाठी लाखो चुका असलेली मतदारयादी वापरण्यात आली आणि तीच यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वापरली जाणार आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





# सपना चौधरीच्या शोमध्ये राडा, खोलीत घुसून गोळ्या घालण्याची दिली धमकी

**मुंबई :** हरियाणाची प्रसिद्ध डान्सर आणि बिग बॉसची माजी कंटेस्टेंट सपना चौधरीच्या शोमध्ये मोठा गदारोळ झाला. छत्तीसगढच्या कोरबामध्ये एक स्टेज शो आयोजित करण्यात आला होता. जेव्हा फॅन्स स्टेजवर चढून नाचू लागले आणि पैसे फेकू लागले. जेव्हा सपना चौधरीने लोकांना स्टेज वरून उतरण्याची आणि पैसे फेकण्यास मनाई केली, तेव्हा दंगा सुरु झाला. परिस्थिती बिघडली तेव्हा सपना शो मधूनच सोडून रिसॉर्टमध्ये आपल्या खोलीत गेली. पण, काही जण तिच्या मागोमाग रिसॉर्टपर्यंत पोहोचले आणि खोलीचा दरवाजा तोडण्याचा प्रयतन करू लागले.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, ही घटना १२ ऑक्तोबर, रविवार रात्री झाली. कार्यक्रम रात्री ९ वाजता सुरू झाला आणि जवळपास अडीच तासानंतर साडे अकरा वाजण्याच्या सुमारास गदारोळ सुरु झाला. रिसॉर्टच्या मॅनेजरने पोलिसात तक्रार दिली. तक्रारीत सांगण्यात आले की, काहींनी सपना आणि तिच्यासोबत आलेल्या लोकांना शिव्या दिल्या आणि गोळी घालण्याची धमकी दिली. शिवाय, रिसॉर्टमध्ये तोडफोड करून सीसीटीव्हीचे डीव्हीआर आणि १० हजार रुपये लूटून नेले.

पोलिसंच्या माहितीनुसार, मॅनेजरने अमित नवरंगलाल अग्रवाल, अनिल द्विवेदी, युगल शर्मा आणइ सुजल अग्रवाल यांच्या विरोधात तक्रार दाखल केलीय. अनिल द्विवेदीने दावा केली की, तो सपना चौधरीला शुभेच्छा देण्यासाठी गेला होता, त्यावेळी रिसॉर्टच्या स्टाफने त्यांच्यासोबत गैरवर्तणूक केली.

# सिकंदरफच्या अपयशावरून सलमान खानचा मुरुगदॉसवर हल्लाबोल

**मुंबई :** सलमान खानने 'सिकंदर' चित्रपटाच्या अपयशावर अखेर मौन सोडलं असून, चित्रपटाच्या दिग्दर्शकावर अप्रत्यक्षपणे जोरदार निशाणा साधला आहे. 'बिग बॉस १९' या रिॲलिटी शोच्या वीकेंड विशेष भागात सलमान खानने 'सिकंदर'च्या शूटिंगदरम्यानच्या घटनांवर भाष्य करताना अनेक गोष्टी स्पष्ट केल्या. विशेष म्हणजे, या वेळी त्याने दिग्दर्शक ए. आर. मुरुगदॉस यांच्या वक्तव्यावर थेट प्रतिक्रिया दिली आणि त्यांच्या आरोपांचा खरपूस समाचार घेतला.




मुरुगदॉस यांनी माध्यमांशी बोलताना दावा केला होता की सलमान शूटिंगदरम्यान वेळेवर सेटवर पोहोचत नव्हते, ज्यामुळे चित्रपटाच्या निर्मितीवर परिणाम झाला. मात्र सलमानने हे आरोप फेटाळून लावत स्पष्ट केलं की त्यावेळी त्याच्या पसलांना इजा झाली होती, तरीही त्याने कामात कसूर केली नाही. ङ्गमाझ्या पसल्या तुटल्या होत्या, त्यामुळे मी रात्री ९ वाजता शूटिंगला पोहोचायचो. पण तरीही काम थांबवलं नाही. आणि आमचे डायरेक्टर साहेब म्हणतात, मी उशीर केला,ङ्ख असं म्हणत सलमानने मुरुगदॉस यांच्यावर नाव न घेता टीका केली. याचबरोबर त्यांनी सांगितलं की, म रुगदॉस यांची अलीकडील दक्षिणेतील फिल्म चरवहरीररीळ मध्ये लीड ॲक्टर संध्याकाळी ६ वाजता सेटवर यायचा, याकडेही त्यांनी कटाक्षानं लक्ष वेधलं.

शोमध्ये उपस्थित असलेल्या कॉमेडियन रवि गुप्ता यांनी सलमानला विचारलं की, त्याला कोणत्या चित्रपटांचं काम केल्याचा पश्चात्ताप होतो का? त्यावर सलमानने स्पष्टपणे दोन चित्रपटांची नावं घेतली – 'सूर्यवंशी' (१९९२) आणि निश्चय' (१९९२). मात्र अलीकडील कोणत्याही चित्रपटाबाबत त्याने असं काही म्हटलेलं नाही.

# 'कुली' चित्रपटाची धमाकेदार कमाई!

**मुंबई :** साउथ सुपरस्टार रजनीकांत हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अजेय नाव आहेत. त्यांची प्रत्येक फिल्म एक नव्या उंचीवर पोहोचते आणि त्यांच्या चाहत्यांचा आनंद दुहेरी होतो. रजनीकांतच्या चित्रपटांचा जलवा पाहायला मिळतोच, पण 'कुली' सारख्या चित्रपटांनी देखील बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. त्यांच्या चित्रपटांच्या यशामुळे त्यांचा सुपरस्टार स्टेटस कायम आहे. 'कुली' चित्रपटाने भारतीय बाजारपेठेतच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपला ठसा उमठवला आहे.

'कुली' चित्रपटाने भारतात ३३७.५० कोटी रुपयांची कमाई केली आहे, तर विदेशी बाजारात याने १८०.५० कोटी रुपयांचा कलेक्शन केला. याचा एकूण वर्ल्डवाइड कलेक्शन ५१८ कोटी रुपये झाला आहे. या चित्रपटाने अनेक हिट चित्रपटांना मागे टाकत एक ऐतिहासिक कमाई केली आहे. 'कुली'चा बॉक्स ऑफिसवर आलेला दबदबा हेच दर्शवितं की रजनीकांतच्या चित्रपटांना आजही प्रचंड चाहत आहे. 'कुली'च्या यशानंतर रजनीकांत हे आपल्या आगामी प्रोजेक्ट्सवर लक्ष केंद्रित करत आहेत. त्यांचे सुपरहिट चित्रपट 'जेलर'चे दुसरे भाग, 'जेलर २', सध्या जोरात शुटिंग करत आहे.




## नेलसनसोबतचा नवीन अध्याय

रजनीकांत आणि नेलसन दिलीप कुमार यांचं सहकार्य यापूर्वी 'जेलर' मध्ये पाहायला मिळालं, आणि या जोडीने चित्रपट सृष्टीमध्ये एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. नेलसनची कथेची निवेदनशैली आणि त्याचा दिग्दर्शनाची पद्धत रजनीकांतला खूपच आवडली आहे. आता, दोघांची एकत्र काम करण्याची योजना प्रगतीत आहे आणि या आगामी चित्रपटाची तयारी सुरू आहे.

या चित्रपटाला २०२६ च्या जून महिन्यात थिएटरमध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. 'जेलर' चित्रपटाने ६५० कोटी रुपयांचा कलेक्शन केला होता, जो एक ऐतिहासिक यश ठरला. या चित्रपटाने भारतातच नाही, तर विदेशात देखील प्रचंड यश मिळवले. आता 'जेलर २' च्या शूटिंगसाठी रजनीकांत आणि नेलसन दिलीप कुमार पुन्हा एकत्र काम करत आहेत.

नेलसन दिलीप कुमारने रजनीकांतला एक नवीन चित्रपटाची स्क्रिप्ट सुनावली आहे, जी रजनीकांतला खूपच आवडली आहे. 'जेलर २' आणि 'कामा हासन'सोबतच्या इतर प्रोजेक्ट्सची शूटिंग पूर्ण झाल्यानंतर, रजनीकांत पुन्हा एकदा नेलसनसोबत काम करण्याची तयारी करत आहेत. रजनीकांत नेलसनच्या कामाच्या शैलीपासून प्रभावित झाले आहेत आणि दोघांच्या सहकार्याने एक नवा चित्रपट तयार होईल, अशी अपेक्षा आहे.



# तिशीतल्या रश्मिकावर भारी पडली पन्नाशीतील मलाइका

**मुंबई :** आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदानाची मुख्य भूमिका असलेल्या थामाबाबत आता एक नवीन अपडेट समोर येते आहे. या सिनेमातील नवे गाणे नुकतेच प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. अर्थात त्या गाण्यात प्रेक्षकांना बऱ्याच दिवसांनी मलायका नृत्याचे जलवे दाखवते आहे.

अर्थात या गाण्यात तिच्यासोबत रश्मि काही दिसते आहे. पण पन्नाशीतील मलाइका या गाण्यात रश्मिकावर भारी पडताना दिसते आहे. न्यूड कलरचा शिमर ड्रेस आणि मोकळे केस यात ती कमालीची खास दिसते आहे. १३ तासातच या गाण्याला युट्यूबवर ३९ लाखांहून अधिक व्यूज मिळाले आहेत. पॉइझन बेबी असे बोल असलेल्या गाण्यात या दोघींच्या डान्सने धमाल उडवून दिली आहे. या गाण्याला जॅस्मिन सँडलस, सचिन – जिगर आणि दिव्य कुमारने गायले आहे. यापूर्वी थामाचे गाणे 'दिलबर की आंखो का' हे रिलीज झाले होते. या गाण्यात नोरा फातेही दिसली होती. या गाण्याला रश्मित कौर आणि जिगर सरैय्या यांनी आवाज दिला होता. याचे बोल प्रसिद्ध गीतकार अमिताभ भट्टाचार्य यांनी लिहिले होते.



थामा हा एक रोमँटिक हॉरर कॉमेडी सिनेमा आहे. जो मडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्स या सिरिजमधला पाचवा सिनेमा आहे. या सिनेमाचे दिग्दर्शन आदित्य सरपोतदारने केले आहे. या सिनेमातून रश्मिका आनुई आयुष्मान पहिल्यांदाच स्क्रीन शेयर करताना दिसणार आहे.

याशिवाय नवाजुद्दीन सिद्दीकी आणि परेश रावलदेखील या सिनेमात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








# भारताकडून क्लीन स्वीप

## इंडियाकडून पाचव्या दिवशी विजयाची औपचारिकता पूर्ण

**नवी दिल्ली :** भारतानं वेस्ट इंडीजविरूद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पाचव्या दिवशी विजयाची औपचारिकता पूर्ण केली. केएल राहुलनं नाबाद अर्धशतक झळकावत भारताला विजयी सीमोल्लंघन करून दिलं. भारतानं दोन कसोटी सामन्यांची मालिका २ – ० अशी जिंकली. याचबरोबर भारतीय संघानं WTC Point Table मध्ये तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे.

सामन्यात ८ विकेट्स घेणाऱ्या कुलदीप यादवला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. तर मालिकावीर म्हणून रविंद्र जडेजाची निवड करण्यात आली. स्ट इंडीज विरूद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याबद्दल बोलायचं झालं तर प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतानं आपला पहिला डाव ५१८ धावांवर घोषित केला होता. भारताकडून



सलामीवीर यशस्वी जयस्वालनं १७५ धावांची दमदार खेळी केली. त्यानंतर कर्णधार शुभमन गिलनं नाबाद १२९ धावांचं योगदान दिलं. या दोघांना साई सुदर्शन ८७, नितीश कुमार रेड्डी ४३ आणि ध्रुव जुरेल ४४ यांनी चांगली साथ दिली होती. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी विंडीजचा पहिला डाव २४८ धावांवर गुंडाळला होता. भारताकडून फिरकीपटू कुलदीप यादवनं विंडीजचा निम्मा संघ गारद केला. त्यानं ८२ धावात ५ बळी टीपले. त्याला रविंद्र जडेजानं ३ तर बुमराह आणि सिराजनं प्रत्येकी १ विकेट घेत चांगली साथ दिली होती. भारतानं विंडीजला फॉलोऑन दिल्यानंतर विंडीजनं दुसऱ्या डावात भारताला कडवा प्रतिकार केला. भारताला दुसऱ्यांदा फलंदाजी करण्याची गरज लागणार नाही असं वाटत असतानाच विडींजनं दुसऱ्या डावात ३९० धावांपर्यंत मजल मारली. दुसऱ्या डावात देखील कुलदीप यादव टीम इंडियासाठी धावून आला. त्यानं १०४ धावात ३ विकेट्स घेतल्या तर बुमराहनं ३ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. सिराजनं २ तर जडेजा आणि सुंदरनं प्रत्येकी १ विकेट घेतली.

भारतासमोर विजयासाठी १२० धावांच आव्हान ठेवण्यात आलं. त्यानंतर भारतानं दुसऱ्या डावात ३ फलंदाजांच्या मोबदल्यात हे आव्हान पाचव्या दिवशी पूर्ण केलं. भारताकडून केएल राहुलनं नाबाद ५८ तर साई सुदर्शननं ३८ धावा केल्या. गिल १३ धावा करून बाद झाला. अखेर विजयाची औपचारिकता राहुल आणि ध्रुव जुरेल यांनी पूर्ण केली.

## कसोटीनंतर जडेजाची तेंडुलकर आणि सेहवागशी बरोबरी

**नवी दिल्ली :** विंडिजविरुद्धच्या टीम इंडियाने वेस्ट इंडिजचा सुपडासाफ करत दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत धमाकेदार विजय मिळवला. या मालिकेत भारतीय संघाचा उपकर्णधार रवींद्र जडेजा याने अष्टपैलू कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले. पहिल्या कसोटीत त्याने फलंदाजी करताना दमदार शतक झळकावले, तर दुसऱ्या सामन्यात गोलंदाजीमध्येही निर्णायक भूमिका बजावली. त्याच्या या उत्कृष्ट योगदानामळे, मालिका संपल्यानंतर त्याला 'प्लेअर ऑफ द सीरीज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रवींद्र जडेजाने आपल्या कसोटी कारकिर्दीत तिसऱ्यांदा मायदेशात 'प्लेअर ऑफ द सीरीज' पुरस्कार जिंकला. या कामगिरीसह त्याने भारताचे दोन महान खेळाडू, सचिन तेंडुलकर आणि वीरेंद्र सेहवाग यांच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे. या दोन्ही दिग्गजांनीही आपल्या कसोटी कारकिर्दीत भारतीय भूमीवर प्रत्येकी तीन वेळा या पुरस्कारावर नाव कोरले होते.

मात्र, भारतीय भूमीवर कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा 'प्लेअर ऑफ द सीरीज' पुरस्कार जिंकण्याचा विक्रम फिरकीपटू रविचंद्रन अश्विनच्या नावावर आहे. त्याने आतापर्यंत एकूण ९ वेळा हा मान मिळवला आहे.

'प्लेअर ऑफ द सीरीज' पुरस्कार मिळाल्यानंतर जडेजाने आपल्या भावना व्यक्त केल्या. तो म्हणाला, ''जेव्हा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी मला सांगितले तुला सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करायची आहे, तेव्हापासून मी एक 'योग्य फलंदाज' म्हणून विचार करत आहे आणि माझ्यासाठी ही गोष्ट प्रभावी ठरत आहे.'' जडेजाने पुढे सांगितले की, ''मी गेल्या अनेक वर्षांपासून आठव्या किंवा नवव्या क्रमांकावर फलंदाजी करत होतो. त्यामुळे माझा दृष्टिकोन वेगळा होता. पण आता फलंदाजी क्रमवारीत बढती मिळाल्यामुळे मला एका जबाबदार फलंदाजासारखे विचार करण्याची संधी मिळाली आहे. या बदलामुळे माझ्या खेळात अधिक सुधारणा झाली आहे.''



## गुमान-गगन जोडीने यूपी योद्धाने तमिळ थलाईवाजचा पराभव केला

**मुंबई :** प्रो कबड्डी लीग (पीकेएल) १२ मध्ये यूपी योद्धाने तमिळ थलाईवाजविरुद्ध उल्लेखनीय पुनरागमन केले, ३२-३१ असा विजय मिळवला. दिल्लीतील त्यागराज इनडोअर स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या रोमांचक सामन्यात, गुमान सिंग आणि गगन गौडा या जोडीने शानदार कामगिरी करत यूपी योद्धाला सलग दुसरा विजय मिळवून दिला.

सुरुवातीला, दोन्ही संघांच्या बचावफळीतील युनिट्सनी शिस्तबद्ध खेळ दाखवला. गुमान सिंग आणि मोईन शफागी यांच्या रिकाम्या छाप्यांनी सुरुवातीच्या मिनिटांत दबाव कायम ठेवला. तथापि, यूपी योद्धाच्या गगन गौडाने नितेश कुमारला 'करो या मर' या यशस्वी छाप्यासह बाद करून संघाला सुरुवातीची आघाडी मिळवून दिली.

महेंद्र सिंगच्या नेतृत्वाखाली यूपी योद्धाचा बचाव सतर्क होता आणि त्याने सलग दोनदा मोईन शफागीचा सामना केला. दरम्यान, तमिळ थलाईवाजचा स्टार रेडर अर्जुन देशवालने आपल्या संघाला नियंत्रणात ठेवले आणि यूपी योद्धाच्या कॉर्नरवरून सातत्याने गुण मिळवले. सागर राठीच्या मजबूत बचावामुळे अनेक टॅकल पॉइंट्स मिळाले आणि थलाईवाजला ऑलआउट करण्यात मदत झाली.

तथापि, यूपी योद्धांनी हार मानण्यास नकार दिला. गगन गौडाने थलाईवाजच्या बचावपटूंवर महत्त्वपूर्ण छापे टाकले,



तर भवानी राजपूतने 'डू ऑर डाई' छापे टाकून गुण जोडले. महेंद्र आणि हितेशच्या बचावात्मक समन्वयामुळे थलाईवाजला महत्त्वपूर्ण आघाडी मिळवता आली नाही. मध्यंतराला तमिळ थलाईवाजने १७-१४ अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या सत्रात, यूपी योद्धाच्या हितेशने उत्कृष्ट बचाव दाखवला आणि सलग दोन टॅकल मारून तमिळचा वेग रोखला. खेळाच्या मध्यभागी, गुमान सिंगने त्याची लय शोधली आणि अनेक यशस्वी छापे केले, ज्यामध्ये रोनक आणि नरेंद्र कंडोला यांना बाद करणारा महत्त्वाचा डबल-पॉइंट छापा होता. असे असूनही, नरेंद्रने दोन 'डू ऑर डाई' छापे टाकून पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला.

शेवटच्या क्षणी यूपी योद्धाने आपली पकड मजबूत केली. गुमान सिंगने शानदार कामगिरी करत खेळ संपवला आणि मध्यंतराला पिछाडीवर असतानाही, त्याच्या संघाला ३२-३१ असा अविश्वसनीय विजय मिळवून दिला.

# इंडियन रेड क्रॉस सोसायटी कार्यालयाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन....

## रेडक्रॉस सोसायटी होणार सामाजिक सेवेचा वटवृक्ष - डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

रेडक्रॉस सोसायटी ही आपल्या जिल्ह्यासाठी नवी असली तरी तिचं कार्य मोठे आहे. या कार्यात प्रत्येकाने थोडा वेळ समाजासाठी दिला, तर ही संस्था लवकरच एक मोठा वटवृक्ष बनेल आणि समाजाला त्याची सावली लाभेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रेडक्रॉस सोसायटीच्या उद्घाटन प्रसंगी केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात इंडियन रेड क्रॉस सोसायटी या सेवाभावी संस्थेच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन व सेवाकार्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा शल्य चिकित्सक तथा पदसिद्ध उपाध्यक्ष (इंडियन रेड क्रॉस सोसायटी) डॉ. भागवत भुसारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, दिव्यांग व पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश छाजेड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र काळे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी बुलढाणाचे कार्याध्यक्ष विनोद जवरे, उपकार्याध्यक्ष ॲड.जयसिंग देशमुख, सचिव रवींद्र लहाने, कोषाध्यक्ष विकास दळवी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, रेडक्रॉस सोसायटी या संस्थेचे आज प्रतीकात्मक वृक्षारोपण केले आहे. आता त्याचे संगोपन आणि विकास ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. संस्था लहान असताना तिचे रक्षण आणि पोषण केल्यास भविष्यात सर्वांना त्याचा लाभ होतो. रेडक्रॉसने स्वतंत्र उपक्रम राबवण्यापेक्षा विद्यमान सामाजिक संस्था व संघटनांशी समन्वय साधावा. दंत चिकित्सक संघटना, आयुर्वेदिक संस्था, आपत्ती मित्र संघटना, दिव्यांग पुनर्वसन केंद्र, तसेच विविध शैक्षणिक संस्था यांच्याशी समन्वय साधून एकत्रित सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.




जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, संस्थेचे कार्यालय सुरळीत चालवण्यासाठी कार्यालयाचे देखभाल, वीज बिल, कर्मचारी मानधन, तसेच नोंदी व रजिस्टर यांसारख्या खर्चासाठी सर्वांनी आर्थिक सहकार्य करावे. रेडक्रॉसचे कार्य वाढवणे ही मोठी जबाबदारी असून, हे कार्य सर्वांच्या सहभागानेच यशस्वी होईल, असे त्यांनी नमूद केले. विशेषतः दिव्यांगांसाठी मोफत सहाय्यक उपकरणे पुरविण्याचे कार्य, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रम राबवण्यावर त्यांनी भर दिला. आपल्या व्यवसायाबरोबर समाजासाठी वेळ देणे ही खरी सेवा आहे. जिल्ह्यातील औद्योगिक संस्था, पतसंस्था आणि प्रभावशाली व्यक्तींनी या सेवाभावी कार्यात पुढाकार घेतला, तर रेडक्रॉस सोसायटी ही एक प्रभावी सामाजिक शक्ती म्हणून उभी राहील आणि गोरगरिबांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळेल,फ़ असे प्रतिपादन डॉ. पाटील यांनी केले. इंडियन रेड क्रॉस सोसायटी या सेवाभावी संस्थेच्या कार्याची माहिती प्रास्ताविकातून इंडियन रेड क्रॉस सोसायटी कार्याध्यक्ष विनोद जवरे यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उज्वला वर्मा यांनी तर आभार महेंद्र सौभाग्य यांनी केले.

# जिल्हा शिक्षक पुरस्कार विजेत्यांचा गौरव सोहळा संपन्न...

## शिक्षणातून बुलढाण्याचा नावलौकिक वाढवा...

जनसंचलन/बुलढाणा

: ग्रामीण भागातील समाज व्यवस्थेचे रूपांतर करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. ही धुरा समर्थपणे पार पाडणाऱ्या शिक्षकांनी बुलढाणा जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन आमदार संजय गायकवाड यांनी केले जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्यावतीने आयोजित जिल्हा शिक्षक गौरव पुरस्कार सोहळा आज गर्दे वाचनालय सभागृहात पार पडला. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशीष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, डॉ. जगराम भटकर (प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था), समाजकल्याण अधिकारी डॉ. अनिता राठोड, शिक्षणाधिकारी विकास पाटील, अनिल आकाळ, डॉ. वैशाली ठग, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक सतीश देशमुख, कृषी विकास अधिकारी पुरुषोत्तम अनगाईत, तसेच जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख, गटविकास अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. आमदार श्री. गायकवाड म्हणाले की, शिक्षक हे समाज परिवर्तनाचे खरे वाहक आहेत. केवळ वर्गखोल्यांतील शिक्षणापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पुरस्कार हा केवळ सन्मान नसून तो एक जबाबदारीही आहे. गौरव प्राप्त शिक्षकांनी आपले ज्ञान इतर शाळांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात म्हणाले की, जिल्हा परिषद प्रशासन सर्व शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी कटिबद्ध आहे. निपुण महाराष्ट्र आणि मिशन झेड या उपक्रमांद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांना





गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शाळेतील शिक्षण हे केवळ पुस्तकातील अभ्यासापुरतेच मर्यादित न राहता प्रत्येक विद्यार्थ्यांचा कलागुण आणि व्यक्तिमत्त्व विकास याकडेही प्रत्येक शिक्षकांने लक्ष दिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी सोबतच शाळेतील उपस्थिती व गुणवत्ता या बाबींकडे प्रशासनाकडून विशेष लक्ष केंद्रित केल्या जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा

भारताचे माजी राष्ट्रपती. डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रारूप आरक्षणाबाबत अधिसूचना प्रसिद्ध

## प्रारूप आरक्षणावर हरकती व सुचनांसाठी १७ ऑक्टोबरपर्यंत मुदत

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती सभापती व सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी काढण्यात आली असून या प्रारुप आरक्षणाबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप आरक्षणाची अधिसूचना जिल्ह्यातील क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली असून या प्रारूप आरक्षण अधिसूचनेबाबत जनतेच्या काही हरकती असल्यास, त्यांनी त्या जिल्हाधिकारी बुलडाणा यांचेकडे १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. बुलढाणा जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक एकूण सदस्य संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच स्त्रियांकरिता राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग व निर्वाचक गणाबाबत प्रारुप आरक्षणाच्या अधिसूचनेची प्रत जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील फलकावर, जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर तसेच तहसिलदार बुलढाणा, चिखली, देऊळगावं राजा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, खामगांव, शेगांव, जळगांव जामोद, संग्रामपूर, नांदुरा, मलकापूर व मोताळा यांचे कार्यालयातील फलकावर आणि पंचायत समिती बुलढाणा, चिखली, देऊळगावं राजा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, खामगांव, शेगांव, जळगांव जामोद, संग्रामपूर, नांदुरा, मलकापूर व मोताळा कार्यालयातील फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रारुप आरक्षण आदेशाच्या मसुद्यास कुणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सकारण लेखी निवेदने, हरकती व सूचना जिल्हाधिकारी यांचेकडे १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावेत. या तारखेनंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे आलेली निवेदने, हरकती व सूचना इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




# खामगाव शहरात दोन चोरटे पकडले; ५0 हजारांचा मुद्देमाल हस्तगत, गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

शहर पोलिसांच्या दक्षतेमुळे दोन सराईत चोरटे पोलिसांच्या जाळ्यात अडकले असून, त्यांनी अकोट (जि. अकोला) येथून ५० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची कबुली दिली आहे. त्यावरून पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी सुमारास खामगाव शहर पोलिस ठाण्याचे डीबी पथक एसबीआय बँकेजवळ पेट्रोलिंग करत असताना दोन व्यक्ती संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तपासाअंती त्यांची ओळख सोनू उमाशंकर सिंग (३२, रा. राजगड, ता. मडीहान, जि. मिर्झापूर, उत्तर प्रदेश) आणि जिब्राल सनोद गुद्रावल (३०, रा. महात्मा फुलेनगर, टॉवर बिल्डिंग, ठाणे पश्चिम) अशी पटली. पोलिस तपासात समोर आले की, दोघेही विविध गुन्ह्यांमध्ये आधीपासूनच आरोपी आहेत. सोनू सिंग याच्यावर हरसूल व उस्मानपुरा (छ. संभाजीनगर) पोलिस ठाण्यांमध्ये चोरी, फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे आदी गुन्हे नोंद आहेत. तर जिब्राल गुद्रावल याच्याविरुद्ध वरतकनगर पोलिस ठाण्यात घरफोडी हजार रुपयांच्या अकोट येथील चोरीची दिली कबुली. आणि मारहाणीचे गुन्हे नोंद आहेत. दोघांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्यांनी अकोट (जि. अकोला) येथे ५०,००० रुपये रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली. अकोट पोलिसांनी याची खात्री केल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्या ताब्यात देण्यात दोघांना आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अपर अधीक्षक श्रेणिक लोढा, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रामकृष्ण पवार यांनी केली

# सेसफंड योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागविले

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद सेसफंड योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये थेट लाभ हस्तांतरण योजनेतुन ७५ टक्के अनुदानावर ५ एचपी मोटरपंप संच, पॉवर ऑपरेटेड स्प्रेअर्स, बॅटरी ऑपरेटेड स्प्रेअर्स, मानवचलीत स्पायरल सीड सेपरेटर, विद्युत चलीत चाफ कटर, मानवचलीत टोकनयंत्र (डिबलर) साहीत्य पुरविणे प्रस्तावीत आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहे. अधिक माहिती करीता संबंधित तालुक्यातील पंचायत समितीमधील कृषि विभागात कृषि अधिकारी (सामान्य) तसेच विस्तार अधिकारी (कृषि) यांचेकडे संपर्क साधावा. तसेच योजनेअंतर्गत विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे दि. ३० ऑक्टोंबर २०२५ पर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी यांनी केले आहे




# ढालसावंगी येथे गोठ्याला आग; तीन गुरांसह ९० कोंबड्यांचा मृत्यू

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा तालुक्यातील ढालसावंगी येथील एका शेतकऱ्याच्या गोठ्याला रविवारी (दि. १३) मध्यरात्री आग लागली. या आगीत तीन गुरांसह ९० कोंबड्यांचा मृत्यू झाला असून, शेतीसाहित्यांचे नुकसान झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, ढालसावंगी येथील शिवाजी तुळशीराम खारडे यांच्या गट क्र. २७ मधील शेतात असलेल्या गोठ्याला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. या आगीत गोठ्यातील एक बैल, गाय, एक गोन्हा व ९० कोंबड्यांचा मृत्य झाला. तसेच, दोन फवारणी पंप, दोन स्प्रिंकलर संच, एक मिनी स्प्रिंकलर संच, टीनपत्रे, शेतीऔजारे, जनावरांचे वैरण आणि टोकण पेरणी यंत्र आदी वस्तू जळून खाक झाल्या. घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय



अधिकारी, तलाठी तसेच धाड पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी करून पंचनामा केला. आगीत नुकसानग्रस्त झालेल्या शेतकरी शिवाजी खारडे यांना शासनाने तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८